## आरोपी तर्फे उलटतपास ॲड. डी.एम.बर्गे यांचेकडुन

हे म्हणणे खरे नाही की, घटनेचे पुर्वीपासून सदर मिळकतीमध्ये आमची वहीवाट नाही. हे म्हणणे खरे आहे की, २०१५ साली मी खटाव तालुक्यात राहणेस होतो.

प्रश्न — २०१५ साली या जमिनीमध्ये जे ज्वारीचे पिक होते ते पिक आरोपींनी पेरले होते?

उत्तर — आरोपींनी त्यांचे हिश्यात पिक पेरले होते व आम्ही आमचे हिश्यात पिक पेरले होते.

माझे आईचे वडील व आरोपी क्र.२ चे वडील हे सख्खे भाउ होते. माझे आईचे वडील परागंदा होते. हे म्हणणे खरे नाही की, आईचे वडील परागंदा झालेवर चंचळी व कुमठे येथील जमिनी आरोपी क्र.२ चे वडील वहिवाटत होते. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, आरोपी क्र.२ चे वडील हे एकत्र कुटुंब मॅनेजर होते. माझे आईचे वडील परागंदा झालेनंतर वीस वर्षानंतर त्यांचा दिवाणी स्वरुपाचा मृत्यु झालेची घोषणा होणेसाठी सातारा न्यायालयात दावा दाखल करणेत आला होता. त्या दाव्याचा निकाल झालेनंतर माझे आईचे व आज्जीचे नाव त्या मिळकतींना नोंद झाले. आरोपी क्र.२ चा भाउ हे माझे सासरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई व आरोपी क्र.२ चे वडील यांचेमध्ये वाटप झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, आईचे व आज्जीचे नाव नोंद झालेनंतर शिंदेंचा मळा या जमिनीमधील दोन एकर पैकी अर्धा एकर जमीन आम्ही भास्कर जगदाळे यांना विकले.

२०१५ साली गट क्रमांक ८१२/१० मध्ये संपुर्ण क्षेत्रात ज्वारीचे पिक होते. सदर मिळकत त्रिकोणी आहे.

हे म्हणणे खरे आहे की, दि.०८/०३/२०१५ चे आधी या मिळकतीमधील ज्वारीचे सर्व पिक उपटुन ठेवलेले होते. हे म्हणणे खरे आहे की,

दि.०८/०३/२०१५ रोजी ज्वारीचे कणसांची कापणी चालु होती. त्या दिवशी कापणीसाठी आरोपी यांच्या पाच ते सहा मजुर महिला उपस्थित होत्या. हे म्हणणे खरे नाही की, दि.०८/०३/२०१५ रोजी कुमठे गावातील कांतीलाल जगदाळे यांनी मला फोन करुन सांगितले की, आरोपी ज्वारीची कापणी करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही शेतात जाताना कापणी करणेसाठी वीळे घेवून गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, शेतात ज्वारीची कापणी चालु आहे हे पाहून मी रागावलो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही शेतात गेलो त्यावेळी आरोपी क्र.२ विहरीवर पाणी आणायला गेला होता. मी आरोपी क्र.१, २ व त्यांच्या मुलगीला ज्वारी काढु नका असे सांगितले होते. आरोपींनी ते पिक आमचेच आहे असे म्हंटले. तिघांनीही एकदम तसे म्हंटले.

आम्ही तिघांनी आरोपींना धराधरी, बाचाबाची, शाब्दीक बाचाबाची, धक्काबुक्की केली नव्हती. आरोपींनीच आम्हा तिघांना धराधरी, शाब्दीक बाचाबाची, धक्काबुक्की केली होती. मी फिर्याद देताना आमचे मध्ये एकमेकांना धराधरी, शाब्दीक बाचाबाची व धक्काबुक्की झाली असे सांगितले नव्हते. त्याबाबत फिर्यादी मध्ये लिहलेले बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आरोपींची मुलगी दिप्ती हीला मी लाथ घालुन खाली पाडले, तीचे हातावर विळा मारला. हे म्हणणे खरे नाही की, दिप्तीचे मनगटावर जखम झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे पत्नीने आरोपी क्र.१ ला मारहाण केली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी दिप्ती हीला हाताला लागलेमुळे कोरेगांव येथील ग्रामिण रुग्णालयात ॲडमिट केले होते. सदरची घटना साधारणपणे पंधरा मिनीटे चालली होती. त्यावेळी शेतातील मजुर महिला उपस्थित होत्या. त्यावेळी आजुबाजुचे शेतामध्ये कोणीही नव्हते. ही घटना सोडविणेचा कोणीही प्रयत्न केला नाही. मला डाव्या डोळयाचे भुईचेवर, उजव्या डोळयाचे कपाळावर जखमा झाल्या होत्या, पाठीवर व उजव्या हातावर दांडक्याचा मार लागला होता. माझे पत्नीला जखम झाली नव्हती.

माझे आईच्या डोक्यावर जखम झाली होती, पाठीवर व पुर्ण अंगावर मार लागला होता. मला झालेल्या जखमा मी डॉक्टरांना दाखविल्या होत्या. आईच्या देखील जखमा डॉक्टरांना दाखविल्या होत्या. आमचेवर कोरेगांव ग्रामीण रुग्णालयात उपचार झाले. दवाखान्यात जाणेसाठी आम्हाला पोलिसांनी यादी दिली होती. माझे शरीरावरील ओळखीच्या खुणा डॉक्टरांनी पाहिल्या नव्हत्या. घटनेनंतर अर्धा ते पाउण तासात डॉक्टरांनी मला तपासले. दि.०८/०३/२०१५ रोजी आम्हाला दवाखान्यातुन सोडले. त्यानंतर आम्ही वडगांव येथे गेलो. त्यानंतर दि.१२/०३/२०१५ रोजी परत येवून तक्रार दिली. दि.११/०३/२०१५ रोजी आरोपी क्र.१ हीने आमचे विरुध्द पोलिस ठाणेत तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने आमचे विरुध्द तक्रार दिलेने पोलिसांनी आम्हाला तसे फोन करुन सांगितले. आम्ही दि.०८/०३/२०१५ रोजी मी पोलिसांना आम्हाला मारहाण झालेबाबत तोंडी तक्रार सांगितली. हे म्हणणे खरे नाही की, माझे डाव्या डोळयाचे भुवईवर, उजव्या डोळयाचे कपाळावर, पाठीवर व हातावर नेमके कोणी मारले हे मला सांगता येणार नाही. घटनेच्या वेळी दोन दांडके होती. एक दांडके दिप्तीच्या हातात व दुसरे दांडके आरोपी क्र.२ चे हातात होते. विळा आरोपी क्र.१ च्या हातात होता.

न्यायालयाची वेळ संपलेने उलटतपास तहकुब करणेत आला.

श्रवणोत्तर स्विकृत

(जी.एस.माने)

तारीख : ०५/०७/२०२२ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोरेगांव